ARTHA
Poona 4.

Reg. No. B. 3434. Licence No. 53.
Licenced to post without prepayment

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

वर्ष १७ पुणें, बुधवार तारीख २६ डिसेंबर, १९५१ अंक ४९

## विविध माहिती

**भारतीय कागदाची निर्यात**— भारतांत तयार झालेला ५,५०० टन कागद पाकिस्तानला निर्यात करण्याचे मुंबईच्या निर्यात अधिकाऱ्यानें जाहीर केलें आहे. भारत–पाकिस्तान ह्यांच्यांत झालेल्या कराराप्रमाणें जुलै १९५१ ते जून १९५२ पर्यंतच्या कालांत निर्यात करावयाचा ५,००० टन कागदहि वरील कागदांत धरण्यांत आला आहे. निर्यातीचें वांटप पुढील प्रमाणें करण्यांत येणार आहे. कागदाचे कारखानदार ४,००० टन; जुने निर्यात–व्यापारी १,००० टन; नवे व्यापारी ५०० टन.

**कैद्यांना दृक् शिक्षण**— म्हैसूरच्या सरकारनें आपल्या राज्यांतील बंगलोर सेंट्रल जेलमधील कैद्यांना दृक्‌शिक्षण देण्यासाठी एक योजना आखली आहे. कैद्यांना आठवड्यांतून दोनदा माहितीपूर्ण असें शिक्षणविषयक चित्रपट दाखविण्याचें ठरविण्यांत आलें आहे.

**पोस्टाचीं तिकिटें रद्द करण्याचें यंत्र**— टपालहंशिलासाठी वापरण्यांत येणारी पोस्टाचीं तिकिटें रद्द करणारी २० यंत्रें पाकिस्ताननें परदेशाहून मागविलीं आहेत. हीं यंत्रें पाकिस्तानांतील प्रमुख शहरांच्या पोस्टऑफिसांतून ठेवण्यांत येणार आहेत. एक यंत्र एका मिनिटांत सुमारें ६०० पत्रांवरील तिकिटांवर पोस्टाचे शिक्के मारूं शकते.

**उत्तर–प्रदेशांत कोळशाच्या खाणी**— उत्तर–प्रदेशांतील मिर्झापूर जिल्ह्यांत २० लाख टन कोळसा सांपडूं शकेल असा अंदाज करण्यांत आला आहे. विंध्य–प्रदेशांतहि एका ठिकाणीं कोळशाचे थर सांपडले आहेत. हे थर सुमारें ५० फूट जाडीचे आहेत. ह्याशिवाय कांचेसाठीं लागणारी वाळू व इतर कांहीं खनिजेंहि उत्तर–प्रांतांत सांपडलीं आहेत असें समजतें.

**मॉस्कोंत गगनचुंबी इमारत**— मास्कोमधील केमलिन ह्या इतिहासप्रसिद्ध किल्ल्याचापाशीं ३२ मजले असणारी एक गगनचुंबी इमारत बांधण्यांत येणार आहे. अमेरिकन पद्धतीच्या उंच इमारती बांधण्याची लाटच सध्यां मॉस्कोंत उसळली आहे. ह्या पद्धतीची ही आठवी इमारत होईल. इमारतींत सरकारी कामकाजासाठी लागणाऱ्या २,००० कचेऱ्यांची सोय करण्यांत येणार आहे.

**रशिआंत कांचेचीं घरें**—रशिआंत घरें बांधण्यासाठी कांचेच्या विटा तयार करण्यांत येत असल्याची बातमी आहे. ह्या विटा स्पंजासारख्या असल्यामुळें त्यांतून हवा येऊं शकते असें म्हणतात. अतिशय थंडी व उष्णता लावून सुद्धां त्या दुभंगल्या नाहींत अगर इतर रीतीनें खराब झाल्या नाहींत.

**अमेरिकेकडून अधिक गहूं मिळणार**— १९५२ सालच्या पहिल्या तिमाहीसाठी भारताला अमेरिकेकडून २,००,००० टन गहूं मिळावयाचा आहे. ह्याशिवाय आणखी ७५,००० टन गहूं अमेरिकेकडून मिळणार आहे, असें जाहीर करण्यांत आलें आहे. भारताशिवाय इजिप्त, आयर्लंड, पेरू व स्वित्झर्लंड, ह्या देशांना द्यावयाच्या गव्हाच्या वांटपांतहि अमेरिकेनें वाढ केली आहे.

**ब्रिटनची मोटारींची निर्यात**—ब्रिटननें ऑक्टोबर १९५० मध्यें किंमतीच्या दृष्टीनें अधिकांत अधिक म्हणजे १,१४,००,००० पौंड किंमतीच्या मोटारी निर्यात केल्या, शेतीचीं अवजारें सुमारें १०,८०० इतकी निर्यात करण्यांत आलीं, त्यांची किंमत ४४,००,००० पौंड भरली.

**१३ व्या शतकांतलें व्याकरण**— मद्रास सरकारनें १३ व्या शतकांतील एक तामीळ भाषेचें व्याकरण प्रसिद्ध करण्याचें ठरविलें आहे. मद्रास सरकारनें जुनीं हस्तलिखितें छापून प्रसिद्ध करण्याचें काम १९०९ सालीं हातीं घेतलें होतें. परंतु नंतर तें बंद पडलें होतें. आता ४२ वर्षांनंतर तें पुन्हां चालू करण्यांत येत आहे.

**६ महिन्यांत ६२ बोलपट**—१९५१ च्या पहिल्या सहा महिन्यांत प. भारतांत ६२ बोलपट तयार करण्यांत आले. १९४९ सालीं सबंध वर्षांत १७४ आणि १९५० सालीं १४४ बोलपट तयार झाले होते. ताज्या आकड्यांप्रमाणें भारतांत ३५ मिलिमीटरचे बोलपट दाखविणारीं २,५९८ चित्रगृहें आणि ६०० फिरतीं चित्रगृहें आहेत.

**कर देणारांची गर्दी**—फ्रान्समधील सरकारनें नुकतेंच असें जाहीर केलें कीं जे नागरिक आपले कर चालू वर्ष संपण्यापूर्वी भरतील त्यांच्याकडून शिक्षेदाखल जास्त पैसे घेण्यांत येणार नाहींत. ह्या सवलतीमुळें ऑंजू नामक एका गांवांतील नागरिकांनीं कर–कचेरींत कर भरण्यासाठी एकच गर्दी केली. त्यामुळें कचेरीच्या पहिल्या मजल्याची तक्तपोशी कोसळली.

**भारतीय बोलपटाला बक्षिस**—अमेरिकेंतील नॅशनल बोर्ड ऑफ रिव्ह्यू ऑफ मोशन पिक्चर्स ह्या संस्थेतर्फे चित्रपटांचें एक प्रदर्शन भरविण्यांत आलें होतें. प्रदर्शनांतील परदेशीय विभागांत भारतीय बनावटीच्या 'दि रिव्हर' ह्या बोलपटाला दुसरें बक्षिस देण्यांत आलें. पहिलें बक्षीस एका जपानी बोलपटानें मिळविलें.



# थोड्या वेळांत कमी खर्चांत

## काम करण्यासाठीं वापरा



**हात पावडीं:**
तीन प्रकारची. टिकाऊ लाकडाच्या दांड्याची. सम-तोल रचनेमुळे वापरण्यास सुलभ व सोयीस्कर. खोल पात्यांमुळे एका खेपेत बऱ्याच मालाची ने-आण करता येते.



**हातोडे:**
विशिष्ट पद्धतीनें ताव दिलेल्या पोलादापासून तयार केलेले विविध आकारांचे घण, पाथरवटांचे हातोडे, मोठमोठ्या मेखा व मोठे खिळे ठोकण्याचे हातोडे, तसेच लहान सहान कामाच्या हातोड्या.



**टिकाव व कुदळ्या:**
मुख्यत्वेंकरून चार प्रकारचे टिकाव व कुदळ्या. सडक-बांधकामासाठीं व खाणींतील कामाकरितां विशेषेंकरून पसंत केल्या जातात. मुद्दाम मजबूत केलेल्या अति तीक्ष्ण टोकामुळें कार्यक्षमता वाढते.

*मजबूत व टिकाऊ*

# टाटा ॲग्रिको अवजारें

दी टाटा आयर्न ॲन्ड स्टील कं० लि०
सेल्स ऑफिस:
२३ बी, नेताजी सुभाष रोड, कलकत्ता
शाखा:—मुंबई, मद्रास, नागपुर, अहमदाबाद, कानपुर, सिकंदराबाद, विजयनगरम् कॅन्टोनमेंट, जलंदर कॅन्टोनमेंट.

# अर्थ

बुधवार, ता. २६ डिसेंबर, १९५१





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


## सहकारी चळवळीच्या प्रगतीमधील विरोधी दिशांचा मेळ कसा बसणार ?

मध्यभारत सहकारी परिषदेचें दुसरें अधिवेशन शिवपुरी येथें ८ डिसेंबर रोजीं भरलें होतें. त्याचें अध्यक्षस्थान श्री. आर. जी. सरय्या ह्यांनीं स्वीकारलें होतें. श्री. सरय्या ह्यांनीं आपल्या भाषणांत प्रथम मध्यभारताची नैसर्गिक संपत्ति व लोकसंख्येचा तुरळकपणा ह्या गोष्टी आर्थिक उद्धारास अत्यंत अनुकूल असल्यानें सहकाराच्या प्रगतीस तेथें चांगला वाव आहे, असें सांगितलें. नव्यानें निर्माण झालेलें हें राज्य अन्नधान्याच्या बाबतींत स्वयंपूर्ण असून चंबळ नदीवरील धरणानें पाण्याखालील क्षेत्रांत पुष्कळच मोठी भर पडणार आहे. १९३७ सालीं ग्वालेर सरकारनें त्या संस्थानांतील सहकारी चळवळीची पहाणी करण्याचें काम कै. प्रोफेसर वा. गो. काळे ह्यांचेकडे सोंपविलें होतें. त्यावेळीं त्यांनीं ज्या सूचना केल्या, त्यांचा श्री. सरय्या ह्यांनीं पुनरुच्चार करून पतपेढ्यांच्या पुनर्घटनेच्या आवश्यकतेचें महत्त्व प्रतिपादन केलें. दोन केंद्रीय (अपेक्स) बँका स्थापन करण्यांत याव्या, अशी प्रो. काळे ह्यांची सूचना होती, परंतु मध्यभारताचें नवें एकसंघी राज्य निर्माण झाल्यानंतर एकच केंद्रीय बँक आता स्थापणें योग्य व इष्ट होईल असें श्री. सरय्या ह्यांनीं सांगितलें. पंचवार्षिक योजनेंतील सहकारी चळवळीच्या स्थानाचें त्यांनीं विवेचन केलें आणि त्यास अनुसरून मध्यभारतांतील सहकारी चळवळीच्या विविध प्रकारच्या प्रगतीची दिशा दाखवून दिली.

स्वावलंबन हा सहकारी चळवळीचा पाया असून त्याविना त्या चळवळीचें लोकशाही स्वरूप रहाणार नाहीं, हें श्री. सरय्या ह्यांनीं पुनः एकवार स्पष्ट करून सांगण्याची संधी सोडली नाहीं. सुरवातीच्या काळांत आणि सरकारचें काम सहकारी चळवळ करीत आहे त्या प्रमाणांत सरकारी मदत आणि सल्ला हीं अपरिहार्यच असलीं तरी सहकारी चळवळ स्वतःच्या पायावर उभी राहिल्याविना ती खऱ्या अर्थानें प्रसार पावली असें म्हणतां येणार नाहीं. बचत आणि काटकसर ह्यांच्या योगानें स्थानिक ठेवी एकत्रित होऊन सहकारी चळवळीचें पोषण झालें पाहिजे. सहकारी चळवळीच्या प्रयत्नांमुळें शेतीचें उत्पादन वाढल्यानंतर ठेवीहि वाढल्या पाहिजेत आणि हंगामी तात्कालिक गरजा अथवा अडचणी सोडल्या तर नेहेमींच्या गरजा तरी सहकारी चळवळीस स्वतःच्या पैशांतून भागवितां आल्या पाहिजेत; सरकार किंवा रिझर्व्ह बँक ह्यांच्या मदतीची कायम गरज भासतां कामा नये, असें श्री. सरय्या ह्यांनीं सांगितलें. सहकारी क्षेत्रांत अगदीं खालपासून वरपर्यंत लायक व विशिष्ट शिक्षण घेतलेल्या कार्यकर्त्यांची आवश्यकता सहकारी चळवळीच्या वाढीस तितकीच जरूरीची आहे, हेंहि त्यांनीं स्पष्ट केलें. सहकारी चळवळीस सरकारी राज्यकारभारांत योग्य स्थान मिळावें आणि त्यासाठी सहकारासाठी स्वतंत्र मंत्री असावा; सहकारी खातें हें एक अत्यंत महत्त्वाचें सरकारी खातें समजण्यांत यावें; मध्यवर्ती सरकारनें वेगवेगळ्या राज्यांतील सहकारी प्रगतीचा आढावा घेणारें व मार्गदर्शन करणारें एक स्वतंत्र खातें उघडावें म्हणजे प्रत्येकाला इतरांच्या अनुभवाचा फायदा मिळूं शकेल; इत्यादि महत्त्वाच्या सूचनाहि त्यांनीं केल्या. मध्यवर्ती सरकारच्या खर्चांत सहकारी चळवळीवर एका पैच्या खर्चाचीहि तरतूद प्लॅनिंग कमिशननें केलेली नाहीं, परंतु सहकारी संघटनेचा जागोजाग उल्लेख करून तिचें महत्त्व तेवढें मान्य केलें आहे ! सहकारी चळवळ ही सरकारच्या कारभाराचें केवळ एक अंग होतां कामा नये, हा श्री. सरय्या ह्यांचा आग्रह कायम आहे; परंतु सहकारी चळवळीचें पाऊल मात्र त्याविरुद्ध दिशेनें पडत आहे आणि ती लोकांची चळवळ खऱ्या अर्थानें होणें अधिकाधिक कठीण होत आहे. चळवळीचें यशमापन करण्याच्या पद्धतीमधील मूलग्राही फरकाचा हा परिणाम आहे, हें उघड आहे.

## सायकलीच्या सुट्या भागांचा कारखाना

बर्मिंगहॅम येथील ट्यूब इन्व्हेस्टमेंट लि. ही कंपनी मद्रास जवळ सायकलीचे सुटे भाग तयार करण्याचा एक कारखाना काढणार आहे. सुमारें दोन महिन्यांपूर्वी सायकली तयार करण्याच्या ज्या कारखान्याचें उद्घाटन झालें त्याच्याजवळच वरील कारखाना निघणार आहे. ट्यूब इन्व्हेस्टमेंट लि. ह्या कारखान्याची वार्षिक सभा कांहीं दिवसापूर्वी झाली. त्यावेळीं कंपनीचे अध्यक्ष मि. स्टेड्फोर्ड ह्यांनींच कंपनीच्या विस्ताराची योजना जाहीरपणें सांगितली. ही कंपनी फिलिप्स, हरक्युलस, आर्मस्ट्रॉंग आणि नॉर्मन मेकर्सच्या सायकली बनविते व ब्रॅम्टन ह्या सायकलीचे सुटे भाग तयार करते. मि. स्टेड्फोर्ड आपल्या दोन सहकाऱ्यांसमवेत भारतांत येऊन गेले होते. त्यावेळीं त्यांनीं नव्या कारखान्याच्या विस्ताराची योजना आंखली. ह्या कारखान्यांत विजेच्या साह्यानें चालणारी कांहीं नवीन यंत्रसामुग्री बसविण्याचा त्यांचा विचार आहे. मेसर्स टाटा लि. ह्या कंपनीचें सहकार्य मिळविण्याबाबतहि बोलणीं झालीं असून तीं उत्तेजनकारक आहेत. विशेषतः पोलादाचा पुरवठा करण्याच्या कामीं टाटा कंपनीची मदत लागणार आहे. सरकारची परवानगी मिळून योजना फलद्रूप झाल्यास टाटा कंपनीच्या पोलादाच्या उत्पादनाशीं तिचा वेळेच्या दृष्टीनें मेळ घालण्यांत येईल. कलकत्ता, मद्रास आणि मुंबई येथील रॉबर्टस मॅक्लीन आणि कंपनी आपल्या मालकीची करण्याबाबत ट्यूब इन्व्हेस्टमेंटतर्फे यशस्वी प्रयत्न करण्यांत आले आहेत. भारतामधील सायकलीच्या बाजारपेठेंत रॉबर्टस मॅक्लीन कंपनीचें बस्तान बसलेलें आहे. अर्थात् त्याचा उपयोग ट्यूब इन्व्हेस्टमेंट कंपनीला होऊं शकेल. सध्या भारत आर्थिक विकासाच्या कांहीं अवस्थांतून जात असल्यामुळें त्याला बऱ्याच अडचणी सोसाव्या लागत आहेत. अशा वेळीं ब्रिटनमधील व्यापारी कंपन्यांनीं पुढाकार घेऊन भारताला मदत केली तर ती हवीच आहे. शिवाय अशा मदतीमुळें उभय देशांमधील संबंधहि हितावह होतील.

### कुटुंब नियोजनाचीं चांचणी केंद्रें

जागतिक आरोग्य-संघटनेतर्फे मि. अब्राहम स्टोन हे सध्या भारताचा दौरा करीत आहेत. भारताची लोकसंख्या अर्थोत्पादना-पेक्षा अधिक वेगानें वाढत असल्यामुळें कुटुंब-नियोजनाचा प्रश्न अलीकडे फार महत्त्वाचा झाला आहे. ह्या बाबतींत भारतीय सरकारला सल्ला देण्यासाठीच मि. स्टोन येथें आले आहेत. कुटुंब नियोजन करण्याच्या कामीं सरकारनें सल्लामसलतीचीं केंद्रें काढावीं असें त्यांचें मत असून ह्या विषयासंबंधीं एक अहवालच ते भारतीय सरकारला सादर करणार आहेत असें समजतें. डॉ. स्टोन हे 'ऱ्हिदमिक पिरिअड' ह्या संज्ञेनें प्रसिद्ध असलेल्या कुटुंब-नियोजन योजनेचे पुरस्कर्ते झाले आहेत. ही पद्धति भारतांत कितपत यशस्वी होईल तें अजमावण्यासाठी दिल्ली, म्हैसूर, मद्रास आणि प. बंगाल अशा चार ठिकाणीं चांचणी-केंद्रें उभारण्यांत येतील असें त्यांनीं एका पत्रपरिषदेंत नुकतेंच सांगितलें. सुमारें एक वर्षाच्या कालांत जरूर ती आकडेवार व इतर माहिती ह्या चार केंद्रांतून उपलब्ध होऊं शकेल असा त्यांचा अंदाज आहे. त्या नंतर ह्या माहितीचा उपयोग करून 'ऱ्हिदमिक पिरिअड' पद्धत भारतांत कशी काय यशस्वी होऊं शकेल तें ठरविण्यांत येणार आहे. ह्या पद्धतीची मूळ कल्पना फार सोपी आहे. दोन रजो-दर्शनाच्या कालावधींत कांहीं ठराविक दिवसांतच गर्भधारणा होण्याची शक्यता असते. त्यावेळीं समागम टाळून स्त्रियांना संततिनियम करतां येईल असें डॉ. स्टोन ह्यांचें मत आहे. उरलेले दिवस डॉ. स्टोन ह्यांच्या मतें 'सुरक्षित' दिवस आहेत. ही पद्धत निरक्षर व अडाणी लोकांना कशी समजाऊन द्यावी ह्यासंबंधीं त्यांचा विचार चालू आहे. भारतामधील २० टक्के लोकांनीं जरी वरील पद्धतीचा अवलंब केला तरी सुद्धा सामान्य लोकांना बराच फायदा होईल, असें डॉ. स्टोन ह्यांचें म्हणणें आहे.

---

### पांडुरंग ॲग्रिकल्चरल प्रॉडक्टस लि.

वरील कंपनीनें ३१ जुलै, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी गूळ विक्री करून १,६२,७५३ रु. मिळविले. धान्य, चारा, इत्यादींच्या विक्रीचे ८,२९९ रु. मिळाले. सर्व खर्च जाऊन व २६,१७१ रु. घसारा काढून ६,१३२ रु. नफा ताळेबंदाकडे वर्ग करण्यांत आला. शिलकी नफा त्यांत मिळविल्यावर नफा वाटणीस ९,४११ रु. झाले त्यांतून ३१ जुलै १९५० अखेरच्या तीन वर्षांचे साठलेले ५% क्यु. प्रेफरन्स डिव्हिडंड देण्यांत आलें व उरलेला २,११८ रु. नफा पुढील ताळेबंदांत ओढण्यांत आला. कंपनीचें वसूल भांडवल ४,६८,०८० रु. असून घसारा फंड १,००,००० रु. झाला आहे. कंपनीकडे १,३९,३२७ रु. च्या ठेवी असून एकूण ताळेबंद ९,९४,७६१ रुपयांचा आहे. मजुरींत वाढ, खताचा तुटवडा, सर्व खर्चांत वाढ, इत्यादि प्रतिकूल परिस्थितींतहि कंपनीनें नफा दाखवून ३ वर्षांचें प्रेफरन्स डिव्हिडंड दिलें आहे. त्या-बद्दल मॅनेजिंग एजंट्स अभिनंदनास पात्र आहेत. (चेअरमन: बी. एच. भाडुले, बी. एस्सी., एलएल. बी. मॅ. एजंट्स: मेसर्स जे. व्ही. ताम्हणकर आणि कं. वार्षिक सभा: १६-१२-५१)

---

### हिराकुड योजनेच्या अंदाजी खर्चांत ४० कोटींची वाढ

हिराकुड योजनेस ४७ कोटी रुपये लागतील असा मूळ अंदाज होता. आतांच्या ताज्या अंदाजाप्रमाणें, योजनेस ८७ कोटी रुपये लागतील.

### दि म्हैसूर सिल्क फिलेचर्स लि.

वरील कंपनीस ३१ मार्च, १९५१ अखेर संपलेल्या वर्षी १,००,४४२ रु. तोटा आला. १९४७ नंतरचा घसारा काढलेला नाहीं आणि शिलकी तोटा ४,९९,८१८ रु. आहे. म्हणजे, ताळेबंदांत एकूण तोटा ६,००,२६० रु. आहे. कंपनीचें वसूल भांडवल ९,७१,८५० रु. असून तिनें १३,५९,२२५ रु. कर्जाऊ घेतलेले आहेत. खेळत्या भांडवलाचा तुटवडा कंपनीस भासत आहे. ऑगस्ट १९५१ नंतर आयात वाढल्यानें किंमती घसरल्या आणि उत्पादन किफायतशीर झालें नाहीं. एकूण गिऱ्हाईकहि कमी झालें आहे. तथापि, उत्पादन वाढविण्याचा व उत्पादन-खर्च कमी करण्याचा प्रयत्न डायरेक्टर बोर्ड करीत आहे. म्हैसूरचे डायरेक्टर ऑफ सेरिकल्चर श्री. के. शमसुद्दिन खान हे कंपनीचे चेअरमन असून श्री. सांबमूर्ति हे सरकारी डायरेक्टर मॅ. डायरेक्टर आहेत. (वार्षिक सभा ३०-१२-५१)

---

### दुर्मिळ कासवाच्या शोधार्थ शास्त्रज्ञ

सुप्रसिद्ध ब्रिटिश प्राणिशास्त्रज्ञ, प्रो. जे. बी. एच. हाल्डेन, एफ्. आर. एस., हे भारतांत आले आहेत. लंडन येथील प्राणि-संग्रहालयाकरितां, स्वतःच्या नाकाचा शेंडा फुगवूं शकणाऱ्या गॅव्हिअल कासवाचा शोध ते गंगा, ब्रह्मपुत्रा व सिंधु नद्यांच्या खोऱ्यांत करणार आहेत. ह्या कासवास लांब अरुंद जबडे असतात, तें मासे खातें व मनुष्यास कांहीं इजा करीत नाहीं.

---

### चर्चच्या जागीं स्टॅलिन

बुडापेस्ट येथील एक रोमन कॅथॉलिक चर्च पाडून तयार केलेल्या चौकांत स्टॅलिनचा पुतळा नुकताच बसविण्यांत आला.

---

**निर्वासित उद्योगपतींना कर्जें**—पंजाबमधील ८४ निर्वासित उद्योगपतींना भारतीय सरकारच्या पुनर्वसाहत संघटनेतर्फे ११,६३,१०० रुपयांचीं कर्जें मंजूर करण्यांत आलीं आहेत. पंजाबमध्यें जीं नवीन औद्योगिक गांवें वसविण्यांत येत आहेत त्या गांवांतून जमिनी घेण्यासाठी वरील कर्जें देण्यांत येणार आहेत. पंजाबमध्यें ६४ नवे कारखाने बांधण्यांत येत असून कारखान्यास योग्य अशा १,५०० जागा विकण्यांत आल्या आहेत.

**क्रिकेटच्या सामन्यांचा नफा**—१९५०-५१ सालीं ब्रिटनचा क्रिकेट संघ ऑस्ट्रेलियाला गेला होता. ह्या सफरींतील सामन्यांच्या उत्पन्नांतून पहिल्या प्रतीच्या ब्रिटिश कौंटी क्लबांना कांहींहि देतां येत नाहीं असें त्यांना एम्. सी. सी. कडून कळविण्यांत आलें आहे. १९४६-४७ च्या सफरींत एम्. सी. सी. ला १७,५०५ पौंड नफा राहिला होता. १९५०-५१ सालीं तो अवघा ३,८४२ पौंड राहिला. वाढता खर्च आणि पाऊस ह्यांच्यामुळें उत्पन्नांत घट आली, असें कारण देण्यांत आलें आहे.

**निवडणुकीसाठी खास बॅगा**—दिल्लीमधील निवडणूक कमिशनचा पत्रव्यवहार त्याला लवकर मिळावा म्हणून पोस्ट-खात्यानें खास बॅगांची सोय केली आहे. ह्या बॅगांवर 'इलेक्शन कमिशन इंडिआ' एवढाच पत्ता लिहावा अशी सूचना करण्यांत आली आहे. असें केल्यानें निवडणुकविषयक टपाल त्वरित पोंचेल अशी अपेक्षा करण्यांत येत आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या खर्चाची वांटणी

युनायटेड नेशन्सच्या खर्चाची सभासद-राष्ट्रांत जी वाटणी करण्यांत आली आहे, ती भारताच्या आर्थिक सामर्थ्याच्या दृष्टीनें भरमसाट आहे. भारताची वर्गणी १९५१ सालासाठी ३·४१% होती ती १९५२ साठी ३·५२% करण्यांत येत आहे. अमेरिका, ग्रेट ब्रिटन, रशिआ, फ्रान्स आणि चीन हे देश वगळले, तर इतर कोणत्याहि देशापेक्षा भारतावरील वर्गणीच्या बोजाचें प्रमाण ज्यास्त आहे. भारताच्या खालोखाल कॅनडा ( ३·३५% ) असून बाकीच्या इतर देशांपैकीं ऑस्ट्रेलियाची वर्गणी सर्वांत ज्यास्त ( १·७७% ) आहे. भारताच्या वर्गणीचें प्रमाण वाढलें, तेवढ्याच प्रमाणांत वर्गणीची रक्कम वाढत नाहीं; युनायटेड नेशन्सचा खर्च दरसाल वाढत जातो आणि त्यामुळें खर्चाच्या रकमेंतहि सालोसाल भर पडत जाते. राष्ट्रीय उत्पन्न, दरमाणशी उत्पन्न, युद्धांत झालेलें नुकसान आणि परराष्ट्रीय हुंडणावळ मिळण्याची शक्याशक्यता, ह्या गोष्टींचा विचार करून वर्गणीचा वाटा ठरविण्यांत येतो. कोणत्याहि देशाची वर्गणी एकूण खर्चाच्या एक तृतीयांशापेक्षां अधिक असूं नये, असा संकेत आहे; तथापि, अमेरिका ३३⅓% पेक्षा ज्यास्त हिस्सा वर्गणी देत आहे. प. युरोपांतील देशांची फार वर्गणी देण्याची शक्यता नाहीं आणि अरबी राज्यांत पॅलेस्टाइनमधून बाहेर पडलेले निर्वासित आले त्यांचेवरील खर्चामुळें त्यांनाहि वर्गणीची थोडी सवलत देण्यांत आली आहे. १९५२ च्या अंदाजपत्रकांत भारत, पाकिस्तान आणि पूर्व युरोपांतील देश ह्यांची वर्गणी वाढविण्यांत आली आहे. ह्याबाबतचे निर्णय केवळ आर्थिक दृष्टीनें घेण्यांत आलेले नसून त्यांत राजकारणहि पण आहे, हें उघड आहे.

सारस्वत को-ऑपरेटिव्ह बँक, लि. (स्थापना १९१८)
शाखा :
१ दादर
२ माहीम
३ बेळगांव
४ पुणें—सोमवार पेठ, सारस्वत कॉलनी, पुणें.
दरमहा १ रु. पासून १०० रुपयांपर्यंत हप्त्याची बचत योजना-व्याज ३ ते ३½ टक्के.
हेड ऑफिस- गिरगांव, मुंबई.

### राष्ट्रीय व दरमाणशीं उत्पन्न : १९४९ चे आंकडे

| देश | राष्ट्रीय उत्पन्न दक्षलक्ष (अमेरिकन $) | दरमाणशीं उत्पन्न (अमेरिकन $) | देश | राष्ट्रीय उत्पन्न दक्षलक्ष (अमेरिकन $) | दरमाणशीं उत्पन्न अमेरिकन $) | देश | राष्ट्रीय उत्पन्न दक्षलक्ष (अमेरिकन $) | दरमाणशीं उत्पन्न (अमेरिकन $) |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| युरोप | | | रशिया | | | आफ्रिका | | |
| ऑस्ट्रिया | १,५०० | २२० | यू. एस. एस. आर. | ५९,५०० | ३१० | इजिप्त | २,००० | १०० |
| बेल्जम | ५,००० | ५८० | | | | केनिया | २०० | ४० |
| बल्गेरिया | ७९० | ११० | उत्तर अमेरिका | | | उ. ऱ्होडेशिया | १३० | ७० |
| चेकोस्लोव्हाकिया | ४,६०० | ३७० | | | | | | |
| डेन्मार्क | २,९०० | ६९० | कॅनडा | १२,३०० | ९०० | द. ऱ्होडेशिया | २१० | १०० |
| फिनलंड | १,४०० | ३५० | क्युबा | १,६०० | ३०० | | | |
| | | | डोमिनिकन | | | युनियन ऑफ | | |
| फ्रान्स | १९,९०० | ४८० | रिपब्लिक | १७० | ७५ | सा. आफ्रिका | ३,४०० | २८० |
| प. जर्मनी | १५,३०० | ३२० | मेक्सिको | ३,००० | १२० | | | |
| | | | | | | आशिया | | |
| ग्रीस | १,००० | १३० | पोर्टोरिको | ६६० | ३०० | | | |
| हंगेरी | २,१०० | २३० | युनायटेड स्टेटस् | २१५,८२० | १,४४० | बर्मा | ६०० | ४० |
| आइसलंड | ७५ | ५४० | | | | सिलोन | ५४० | ७५ |
| | | | | | | भारत | १८,३०० | ५४ |
| | | | दक्षिण अमेरिका | | | इराण | १,६०० | ९० |
| आयर्लंड | १,२०० | ४१० | | | | इस्राएल | ४०० | ३९० |
| इटली | १०,६०० | २३० | आर्जेंटिना | ५,३०० | ३२० | जपान | ८,००० | १०० |
| जुगोस्लाव्हिया | २,३५० | १५० | ब्राझील | ५,५०० | ११० | पाकिस्तान | ३,६०० | ५० |
| लक्झेंबर्ग | १७५ | ५९० | चिली | १,१०० | १९० | फिलिपाइन्स | ८५० | ४५ |
| नेदरलंडस् | ४,९०० | ५०० | कोलंबिया | १,४०० | १३० | सिरिया | ३३० | १०० |
| | | | इक्वेडॉर | १३५ | ४० | थायलंड | ६८० | ४० |
| नॉर्वे | १,९०० | ५९० | | | | टर्की | २,१०० | ११० |
| पोलंड | ७,३५० | ३०० | पॅरेग्वे | ११० | ८५ | | | |
| स्पेन | ४,८४० | १७० | पेरू | ८०० | १०० | ओशिपनिआ | | |
| स्वीडन | ५,७०० | ८२० | सुरिनम | ३५ | १६० | | | |
| स्विट्झरलंड | ३ ९४० | ८५० | युराग्वे | ७८० | ३३० | ऑस्ट्रेलिया | ५,५०० | ७०० |
| ग्रेट ब्रिटन | ३८,९०० | ७७५ | व्हेनेझुएला | २,२७० | ४८० | न्यूझीलंड | १,४२० | ७५० |

—सर्व प्रांतांतील—
सुती-गरम-रेशमी
—खादीचें माहेरघर—
खादी मन्दिर
२६१, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २.

## क्रूड ऑईलच्या उत्पादनाचे तुलनात्मक आकडे
### ( १९५० )

| | हजार मेट्रिक टन | एकूण उत्पादनाशी प्रमाण % |
|---|---|---|
| युनायटेड स्टेटस | २,७१,०८१ | |
| कॅनडा | ३,७३८ | |
| एकूण उत्तर अमेरिका | २,७४,८१९ | ५२.२ |
| वेनेझुएला | ७८,२४० | |
| कोलंबिया | ४,७८४ | |
| त्रिनिदाद | २,९८८ | |
| एकूण कॅरिबिअन प्रदेश | ८६,०१२ | १६.४ |
| मेक्सिको | १०,२९९ | |
| अर्जेंटिना | ३,४९२ | |
| पेरू | १,९९० | |
| एक्वेडॉर | ३४५ | |
| बोलिव्हिया, ब्राझील, चिली, क्युबा | २२० | |
| एकूण लॅटिन अमेरिका | १६,३४६ | ३.० |
| साउदी अरेबिया | २६,९०४ | |
| पर्शिया | ३२,२५८ | |
| कुवाट | १७,२९१ | |
| इराक | ६,८०२ | |
| इजिप्त | २,३४३ | |
| काटार | १,६३५ | |
| बेहरिन | १,५१२ | |
| टर्की | १७ | |
| एकूण मध्यपूर्व | ८८,७६२ | १६.८ |
| इंडोनेशिया | ६,४१५ | |
| ब्रि. बोर्निओ | ४,३४६ | |
| जपान | ३०० | |
| भारत | २५२ | |
| वे. न्यूगिनी | २५० | |
| पाकिस्तान | १७३ | |
| चीन | १०० | |
| बर्मा | ६७ | |
| एकूण अतिपूर्व | ११,९०३ | २.२ |
| जर्मनी | १.११८ | |
| नेदरलंडस | ७०७ | |
| फ्रान्स | १२८ | |
| ग्रेट ब्रिटन, इटली, फ्रें. नॉर्थ आफ्रिका | १०० | |
| एकूण पश्चिम युरोप | २,०५३ | .४ |
| रशिया | ३७,९०० | |
| रुमेनिया | ४,३०० | |
| ऑस्ट्रिया | १,५२५ | |
| हंगेरी | ५०० | |
| युगोस्लाव्हिया | १५० | |
| पोलंड | १७८ | |
| अल्बेनिया | १५० | |
| चेकोस्लोव्हाकिया | ८० | |
| एकूण पूर्व युरोप | ४४,७८३ | ९.० |
| एकूण जागतिक उत्पादन | ५२,४६,७८,००० | १००.० |

क्रूड ऑईलचा पेट्रोल म्हणून किंवा वंगण म्हणून उपयोग करण्यापूर्वी तें शुद्ध करावें लागतें. क्रूड ऑईलचें साधें डिस्टिलेशन केलें तर क्रूड ऑईलच्या फक्त २०% पेट्रोल मिळतें. क्रॅकिंग पद्धतीनें पेट्रोलचें हें प्रमाण वाढविण्यांत येतें. एकट्या अमेरिकेंत तेलशुद्धीचे ३६४ कारखाने आहेत व त्यांत ६५,४०,२६५ पिपें क्रूड ऑइलचें शुद्धीकरण रोज केलें जातें. अमेरिकेबाहेरील सर्व जगांत मिळून २४१ कारखाने असून त्यांत दररोज ४०,५०,०२० पिपें क्रूड ऑईल शुद्ध होतें. अर्जेंटिना, कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, इटली, जपान, ग्रेट ब्रिटन, वेनेझुएला, वेस्ट इंडीज, ह्या देशांतच तेलशुद्धीचे कारखाने मोठ्या प्रमाणावर आहेत. भारतांतील एकमेव कारखान्यांत दररोज ५,७५० पिपें क्रूड ऑईल शुद्ध होऊं शकतें.

## कलकत्ता नॅशनल बॅंकेचें वायंडिंग-अप होणार नाहीं.

### कलकत्ता हायकोर्टाचा हुकूम

कलकत्ता नॅशनल बॅंक लि. च्या वायंडिंग—अप साठी बॅंकेचे मॅनेजिंग डायरेक्टर, श्री. भट्टाचार्यजी ह्यांनीं, कलकत्ता हायकोर्टांत अर्ज केला होता, तो हायकोर्टानें नामंजूर करून इंडियन कंपनीज ॲक्टाच्या १५३ व्या कलमाखालीं एक स्कीम मंजूर केली. जे ठेवीदार तात्काळ ठेवी परत मागतील त्यांना २५% रक्कम मिळावी, आणि जे आपल्या येण्याचे हक्क बॅंक ऑफ जयपूर लि. कडे एक वर्ष ठेवून देतील त्यांना ३३⅓% रक्कम मिळावी अशी ती योजना आहे. रिझर्व्ह बॅंक आणि भारत सरकार ह्यांची कलकत्ता बॅंकेनें कांहीं देणीं असल्यास त्यांवर हा हुकूम बंधनकारक नाहीं.


## महाराष्ट्र सहकारी विद्यालय, पुणें

या विद्यालयाचे वर्ग दि. २ जानेवारी १९५२ पासून नं. ५ बयरामजी जिजिभाई रोड, पुणें १ येथें सुरू होणार आहेत. या विद्यालयांत सहकारी खात्यांतील व सर्व प्रकारच्या सहकारी संस्थांतील दुय्यम नोकर-वर्गास व मॅट्रिक अगर एस्. एस्. सी. उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यांत येतो. फी रु. ४० फक्त. उमेदवारांनीं दि. १ जानेवारी १९५२ चे आंत अर्ज करावे.

बा. वि. कुंभारे,
सुपरिंटेंडेंट.

## पांढऱ्या कोडावर

सन १९२६ पासून आजपर्यंत बक्षिसें व हजारों प्रशस्तिपत्रें मिळालेलें अनुभविक औषध. किं. ५ रु. पो स. १५ आं. अनेक लोकांचे " अनुभव ". एक आण्याचें तिकिट पाठवून मागवा. वैद्य के. आर. बोरकर, पो. मंगरुळपीर, जि. आकोला ( वऱ्हाड ).

# सहकार आणि सरकार

(द. रि. चितळे, पुणें सेंट्रल को. बँक लि. चे सेवानिवृत्त मॅनेजिंग डायरेक्टर)

सहकार हा ऐच्छिक असून त्याचा आत्मा स्वातंत्र्य व स्वावलंबन मानला जातो.

समाजांतील मध्यमवर्गीय व गरीब लोकांचें आर्थिक जीवन सुधारण्याचें एक साधन म्हणून गेल्या शतकांत युरोपांतील कांहीं देशांतील लोकांनीं सहकारी चळवळ सुरू केली, व तिची वाढ होऊन राष्ट्रीय जीवनांत तिचें स्थान स्थिर झाल्यावर त्या त्या देशांतील सरकारांनीं तिच्याकडे आपलें लक्ष हळूहळू वळविलें. ज्या ज्या देशांत या चळवळीचा प्रारंभ जनतेच्या स्वयंस्फूर्तीनें झाला, तेथें तेथें या चळवळीची झालेली प्रगति व राष्ट्रांतील आर्थिक जीवनांत तिनें प्रस्थापित केलेलें आपलें स्थान, लक्षांत घेऊन त्या त्या सरकारांनीं या चळवळीशीं आपला संबंध रहावा या हेतूनें, तसेंच राष्ट्रांतील गरीब–गुरीब जनतेला उपयोगी वाटणाऱ्या चळवळीविषयीं व तिच्या धोरणाविषयीं आपली सहानुभूति दर्शविण्याच्या हेतूनें या चळवळीबाबत वेळोवेळीं वेगवेगळे कायदेकानू करून व तिला हरएक प्रकारच्या सवलती व मदती देऊन त्या चळवळीशीं आपला संबंध जोडून घेतला, असें पाश्चात्य राष्ट्रांतील सहकारी चळवळीचा विचार करतां दिसून येतें. हिंदुस्थानांत मात्र याच्या उलट परिस्थिति असल्याचें दिसतें. कारण आपल्या देशांत सहकारी चळवळ लोकांच्या स्वयंस्फूर्तीनें सुरू झाली नसून ती सर्वस्वीं सरकारच्या इच्छेनुरूप व त्याच्याच पुरस्कारावरून निर्माण झाली. त्यामुळें हिंदुस्थानांतील सहकारी चळवळ स्वतंत्र व स्वावलंबी अशी न राहातां ती सरकारची अंकित व सरकारावर अवलंबून असलेली अशींच कित्येक वर्षे राहिली. या चळवळीची प्रारंभाचे काळांत झालेली वाढ ही सर्वस्वीं सरकारच्या मदतीमुळें व सहानुभूतीमुळें होऊं शकली असें म्हटलें तर तें चुकीचें होणार नाहीं. वेगवेगळ्या प्रकारच्या सहकारी संस्थांच्या कामकाजाचें सिंहावलोकन केल्यास, तसेंच सहकारी खात्याचा वरिष्ठ अम्मलदार म्हणजे रजिस्ट्रार व त्याचे हाताखालील अनेक अम्मलदार यांना सहकारी संस्थांच्या अंतर्गत कारभारांत हस्तक्षेप करण्याचे जे अनेक अनिर्बंधित अधिकार दिले आहेत ते लक्षांत घेतल्यास, हिंदुस्थानांतील सहकारी चळवळ ही लोकांनीं सुरू केलेली चळवळ नसून तें एक सरकारचें धोरण आहे असें कोणासही वाटणें शक्य आहे. सहकारी चळवळीची योग्य प्रकारें वाढ यापुढें आपल्या देशांत व्हावयास पाहिजे असल्यास हल्लींच्या परिस्थितींत पुष्कळच फेरफार घडवून आणावा लागेल असें तज्ज्ञांचें मत असून तें त्यांनीं अनेक प्रसंगीं स्पष्टपणें बोलूनही दाखविलेलें आहे. मुंबई राज्यांतील सहकारी चळवळींत ज्यांनीं आपलें बहुतेक सर्व आयुष्य खर्च केलें आहे अशा श्री. वैकुंठराय मेहता यांनीं सन १९४२ मध्यें मुंबई येथें भरलेल्या शिक्षण–वर्गांत या विषयासंबंधीं आपले जे विचार सांगितले होते ते मुंबई प्रॉ. को. इन्स्टिट्यूटनें नुकत्याच प्रसिद्ध केलेल्या पुस्तकांत आतां छापून प्रसिद्ध झाले आहेत. ते विचार याच स्वरूपाचे होते; व त्यांत सहकारी चळवळीवर सरकारचें फाजील दडपण पडत असून त्यामुळें चळवळ स्वावलंबी न होता ती परावलंबी होत राहिली आहे असेंच त्यांनीं प्रतिपादन केलें होतें. तसेंच आपल्या राज्यांतील दुसरे एक प्रमुख व तज्ज्ञ सहकारी कार्यकर्ते श्री. आर. जी. सरय्या, मुंबई प्रॉ. को. बँकेचे चेअरमन, यांचा ता. २३ जुलई, १९५१ रोजीं ऑक्सफर्ड येथें भरलेल्या शेतकरी सहकारी परिषदेपुढें वाचण्यांत आलेला प्रबंध पहातां त्यांनींही या विषयासंबंधीं असेंच मत प्रतिपादन केलेलें दिसतें. सहकारी संस्था या सरकारी संस्था होता कामा नयेत, त्यांचें स्वातंत्र्य अबाधित राहिलें पाहिजे व त्या परावलंबी होणार नाहींत अशी काळजी घेतली गेली पाहिजे, असा त्यांनीं त्या प्रबंधांत स्पष्ट इशारा दिलेला आहे. या दोन तज्ज्ञांचे विचार लक्षांत घेतले म्हणजे हिंदुस्थानांतील व विशेषतः मुंबई राज्यांतील सहकारी चळवळ ही आजपर्यंत जशी परावलंबी राहिलेली आहे तशीच ती यापुढेंही बाहेरील मदतीवर अवलंबून राहून चालणार आहे कीं काय, अशी साधार भीति वाटूं लागते. आपल्या सरकारनें या चळवळीशीं आपला असलेला घनिष्ठ संबंध आहे तसाच चालू ठेवावा. तसेंच या चळवळीस वेळोवेळीं प्रोत्साहन देऊन गरजेप्रमाणें आर्थिक मदत व इतर प्रकारचें सहाय्यही देत रहावें. परंतु मिळत राहणाऱ्या मदतीमुळें ही चळवळ परावलंबी होता कामा नये; तसेंच सरकारी मदतीवर सदैव अवलंबून राहण्याची वृत्ति अगर खोड सहकारी संस्थांना लागता कामा नये. जनतेचें आर्थिक जीवन सुधारण्याचे दृष्टीनें हरएक प्रकारचे इलाज योजणें हें सरकारचें कर्तव्य आहे व तें अंशतः पार पाडण्याचे दृष्टीनें सहकारी चळवळीचा विशेष उपयोग होण्यासारखा आहे. म्हणून या चळवळीची आपल्या राज्यांत वाढ व्हावी या हेतूनें या चळवळीस सरकारनें हरतऱ्हेची मदत करणें हें त्याच्या स्वतःच्या हिताच्या दृष्टीनेंही, सरकारचें कर्तव्यच ठरतें. परंतु ही मदत करीत असतांना सहकारी चळवळीचा लगाम आपल्या हातीं राहावा व लगामाच्या दोऱ्या जशा ओढल्या जातील त्या मानानें व त्या दिशेनें या चळवळीनें चालावें अगर चालण्यास तिला भाग पाडावें, असा हेतु त्यामागें असता कामा नये. मात्र असा हेतु मनांत न बाळगता सरकारनें जर कांहीं मदत चळवळीस देऊं केली तर ती स्वीकारण्यांत कांहीं कमीपणा आहे असें आम्हांस तरी वाटत नाहीं.

वरील विचार सुचण्याचें कारण हें कीं, मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनीं नवीन एक फार मोठी व जोखमीची कामगिरी पार पाडण्याची जबाबदारी अलिकडे पत्करली आहे व ती पार पाडण्यासाठी त्यांना सरकारची आर्थिक व इतर प्रकारची मदत फार मोठ्या प्रमाणांत घेणें प्राप्त होईल अशी भीति वाटते; व ही मदत स्वीकारण्याचें ठरविल्यास आपली चळवळ त्या मानानें परावलंबी होईल असेंही वाटतें.

आपल्या प्रांतांतील सहकारी संस्था पूर्णपणें स्वतंत्र, स्वयंशासित व स्वावलंबी असाव्या असें वाटत असेल तर त्यांनीं अंगिकारावयाचीं कामें त्यांच्या स्वतःजवळ असलेल्या आर्थिक बळाचे व मनुष्यबळाचे मानानें त्यांना सहजीं झेपतील व पेलतील अशींच असावींत. आपल्या शक्तिबाहेरील कामें वृथाभिमानास अगर खोट्या महत्त्वाकांक्षेस बळी पडून त्यांनीं पत्करल्यास ती पार पाडण्यासाठीं त्यांना सरकारच्या व इतरांच्या बाहेरील मदतीवर स्वाभाविकपणेंच अवलंबून राहावें लागेल. तसें करणें हें स्वातंत्र्याच्या व स्वावलंबनाच्या दृष्टीनें त्यांना अनहितकारकच ठरेल.

या दृष्टीनें विचार करता असें दिसून येतें कीं, मुंबई राज्यांतील सहकारी संस्थांनीं जी एक नवीन कामगिरी स्वीकारली आहे ती त्यांच्या शक्तीच्या बाहेरची असल्यानें, त्यासाठीं बाहेरील आर्थिक व इतर मदत फार मोठ्या प्रमाणांत त्यांना मिळाल्याशिवाय ती कामगिरी त्यांना योग्य प्रकारें पार पाडणें अशक्य होईल.

(अपूर्ण).

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉपेन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## ठेवी स्वीकारण्यांत येतात

ठेवींवर दरसाल दर शेंकडा ७॥ रुपये व्याज दिलें जातें. व्याज दर तीन महिन्यांनीं दिलें जातें. ठेवीदारास ठेवीची मुदत संपण्यापूर्वी आपली रक्कम परत पाहिजे असल्यास एक महिन्याच्या आगाऊ नोटिसीनें केव्हांही व्याजासह परत मिळूं शकते.

**पेडणेकर आणि कंपनी लिमिटेड**

शिवण्याच्या यंत्रांचे व्यापारी,

१७२, गिरगांव रोड, मुंबई ४

टेलिफोन ३२७३८ तारेचा पत्ता : 'PEDNECO' Bombay.

## दि बॉम्बे प्रॉव्हिन्शिअल को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

९ बेक हाऊस लेन, कोट, मुंबई.

स्थापन साल १९११

चेअरमनः—श्री. आर. जी. सरैय्या, ओ. बी. ई.


| | |
|---|---|
| भागांचें भांडवल | रु. ४८,२६,००० |
| गंगाजळी फंड | रु. ३३,५१,००० |
| ठेवी | रु. ८,६१,९७,००० |
| खेळतें भांडवल | रु. १०,४३,९३,००० |

**१५ जिल्ह्यांत ६५ शाखा**

भारतांतील प्रमुख शहरीं हुंड्या, बिलें वगैरे वसुलीची व्यवस्था आहे. सर्व प्रकारच्या ठेवी स्वीकारल्या जातात. शर्तीबद्दल चौकशी करावी.

व्ही. पी. वर्दे

ऑ. मॅनेजिंग डायरेक्टर.




## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

( शिड्यूल्ड बँक )

प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग

पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,१९,४८५ |
| खेळतें भांडवल | रु. ७५,००,००० |

मुंबई शाखाः—कॉमनवेल्थ बिल्डिंग, ८२, मेडोज स्ट्रीट, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. द्वा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

श्री. गो. धों. जोगळेकर, बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर.

श्री. सी. टी. चितळे, मॅनेजिंग डायरेक्टर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास', ८२३ शिवाजीनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.